# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

जाहिरात क्र. ३१४/ पी.आर

## थेट मुलाखत

दिनां:-२५/०८/२०२६

नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील माहिती व तंत्रज्ञान विभागाअंतर्गत अनुभवी व तज्ञ मनुष्य बळाची कमतरता असल्यामुळे व विविध तंत्रज्ञान, रिमोट सेन्सींग व GIS विषयक प्रकल्पांसाठी व्यवसाय विकास (Business Development), प्रकल्पाची संकल्पना मांडणे, उपाययोजनांची रचना (Solution Design), सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) आणि प्रणाली आवश्यकता तपशील (SRS) तयार करणे इत्यादी कामे करण्याकरिता नागपूर महानगरपालिकेत अनुभवी व तज्ञ वरिष्ठ तांत्रिक अधिकाऱ्यांची आवश्यकता असून माहिती व तंत्रज्ञान विभागाअंतर्गत "तंत्रज्ञान सल्लागार" या पदावर शासन निर्णय दि. १० जून, २०२५ नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीनुसार करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याच्या कालावधीकरिता थेट मुलाखतीद्वारे तात्पुरती नियुक्ती करावयाची आहे.

इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि.०२/०९/ २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता, अति. आयुक्त (सामान्य), सिव्हील लाईन्स, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | "तंत्रज्ञान सल्लागार" (It Project) | ०१ | ७० वर्षापेक्षा जास्त नसावी | १) शासकीय / निमशासकीय/ शासन अंगीकृत स्वायत्ता संस्था/महामंडळे यातुन वर्ग – १ किंवा समकक्ष पदावरुन सेवानिवृत्त झालेले असावे.<br>२) MCA, BE (IT/CSE)/BTech (IT/CSE) or Higher शैक्षणिक अर्हता आवश्यक<br>३) Gis Technology, Geo Server, It Project DPR यातील काम करावयाचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>४) निमशासकीय/ शासकीय यंत्रणेसोबत माहिती व तंत्रज्ञान विषयक काम केल्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव |

**अर्हता:-**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

२. इच्छुक उमेदवारांनी आपले लेखी अर्ज अति. आयुक्त (सामान्य), नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे सादर करावेत.

३. वयोमर्यादा विचारात घेतांना दि.02 /09/ २०२६ ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

४. उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्राच्या छायाप्रती स्वसाक्षांकीत करून जोडाव्यात.

**५.** करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च **माहिती व तंत्रज्ञान विभागातुन काढण्यात येईल.**

६. उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा.

७. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

८. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

९. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

१०. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहिल.

११. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहिल.

१२. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.त्यांच्या कामकाजा बाबत. नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

१३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

१४.करार पध्दतीने नियुक्ती करताना सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता असणार नाही.

१५.नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल, तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

१६. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

१७.मासिक पारिश्रमिक-शासकीय/निमशासकीय/स्थानकि स्वराज्य संस्था या सारख्या संस्थेतून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मुळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रक्कमेऐवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित

करण्यात यावे, आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्ष) कायम राहील.

१८. सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

१९. सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी, तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही गुन्हा दाखल नसावा व चारित्र्य चांगले असावे.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता/अटी/शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

डॉ. विपीन (भा.प्र.से)
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

दिनांक:- / /२०२६

## अर्जाचा नमूना

१. पदाचे नाव :- ..........................................................................................

२. अर्जदाराचे नांव :- ..........................................................................................

३. पूर्ण पत्ता :- ..........................................................................................

..........................................................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :- ..........................................................................................

ई-मेल आय डी :- ..........................................................................................

४. जन्म दिनांक :- ..........................................................................................

५. दि. / /२०२६ ला वय :- ..........................................................................

६. उमेदवारांचे जात व जातीचा संवर्ग :- ..........................................................................

७. सेवानिवृत्तीचे वेळी धारण
केलेले पद व कार्यालय व
सेवानिवृत्ती दिनांक :- ..........................................................................................

८. शैक्षणिक पात्रता :- ..........................................................................................

९. अ) सेवाकाळातील विभागीय
चौकशी सुरु आहे/ होती काय ?

ब) असल्यास विभागीय चौकशीत
शिक्षा झाली होती का ?

क) अर्जदारा विरुध्द कोणताही
गुन्हा दाखल आहे का ?

ड) गुन्हा दाखल असल्यास गुन्हाबाबत तपशील

९. अनुभवाचा तपशील :- ..........................................................................................

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेल्या पदाचे नाव | कालावधी (पासून-पर्यंत) | कामाचा अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

स्वाक्षरी